जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/२५८२०३/२०२३

वाहतूक नियंत्रण अधिसुचना दिनांक -१२/०७/२०२३

दिनांक १३/०७/२०२३ रोजी आषाढी वारी सोहळा पार पाडुन जगद्गुरु संत श्री तुकारात महाराज यांची पालखी परत देहु गावी परतणार असुन सदर पालखीचे मार्गात वारकरी, भाविक यांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असल्याने सदर मार्गावरील जड अवजड वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करुन तात्पुता स्वरुपात आदेश काढण्यात येत आहे.

## जगतगुरु संत श्री तुकाराम महाराज यांचे पालखीचा परतीच्या मार्गावरील जड वाहनांसाठी करण्यात येणारे वाहतुकीचे डायव्हर्शन

### भोसरी वाहतूक विभाग

१.जुना पुणे मुंबई हायवेवरील नाशिक फाटा कडुन पिंपरी बाजुकडे सर्व जड अवजड वाहनांस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग :- १. वरील मार्गावरील सर्व जड अवजड वाहने नाशिक फाटा येथुन उजवीकडे वळुन भोसरी मार्गे इच्छित स्थळी जातील.

२.वरील मार्गारील सर्व जड अवजड वाहने नाशिक फाटा येथुन डावीकडे वळुन सांगवी मार्गे इच्छित स्थळी जातील.

### पिंपरी वाहतुक विभाग

१.पिंपरी पुल- (पिंपरी पुलावरुन शगुन चौकाकडे किंवा भाटनगर कडे येणारे वाहनांचा रस्ता बंद करण्यात येणार आहे) पालखी भाटनगरपासुन स्मशानभुमी पिंपरी कडे जाईपर्यंत वाहतुक बंद करण्यात येत आहे.

२. हनुमान मंदीर चौक (पिंपरी गावाकडे येणारी वाहतुक अवजड वाहने मदर टेरेसा उड्डाणपुलावरुन काळेवाडी मार्गे वळविणे)

३. पिंपरी गावाकडे येणारी व पिंपरी गावातुन बाहेर पडणारी वाहतुक डेअरी फार्म व साई चौक भुयारी मार्गे वळविणे.

४. भाटनगर कडुन येणारी पिंपरी गावाकडे येणारी वाहतुक रिव्हर रोउ कराची चौक साई चौक मार्गे पिंपरी गावाकडे वळविणे.

५. साई चौकाकडुन शगुन चौकाकडे येण्यास जड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

६. काळेवाडी पुलाकडुन डिलक्स चौकाकडे येण्यास जड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

### चिंचवड वाहतुक विभाग

१.महावीर चौकाकडुन खंडोबामाळ, निगडी कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग : वरील मार्गावरील वाहने महावीर चौक ते चाफेकर ब्रिज मार्गे इच्छित स्थळी जातील.

२.चाफेकर चौक - एल्प्रो मॉलकडुन लिंकरोडला जाणारा रोड सर्व प्रकारच्या जड /अवजड वाहनासाठी बंद राहील.

Scanned with CamScanner

**पर्यायी रस्ता** - सदरची वाहने ही अहिंसा चौक येथुन डावीकडे वळुन महावीर चौकाकडुन इच्छित स्थळी जातील.

३.मोरया हॉस्पिटल चौक-लिंकरोड कडुन चिंचवड गावाकडे येणारी जड/अवजड वाहनांना प्रवेश बंद राहील.

पर्यायी रस्ता - मोरया हॉस्पिटल चौक – गांधीपेठ - मोरया गोसावी मंदिर कडुन रिव्हर व्ह्यु चौकाकडुन इच्छित स्थळी जातील.

४.एस.के.एफ.चौक - चिंचवड मार्गाने खंडोबा माळ चौकाकडे जाणारे जड/अवजड वाहनांना प्रवेश बंद राहील.

**पर्यायी रस्ता** - सदरची वाहने ही बिजलीनगर चौक मार्गाने इच्छित स्थळी जातील.

## निगडी वाहतुक विभाग

१.खंडोबामाळ चौकाकडून टिळक चौकाकडे जड वाहनांना प्रवेश बंदी

**पर्यायी मार्ग** :- खंडोबा माळ चौकातुन डावी कडे वळुन चिंचवड स्टेशन- महावीर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

२.त्रिवेणीनगर चौकाकडुन भक्ती शक्ती चौकाकडे जाण्यास जड/अजवड वाहनांना प्रवेश बंदी

**पर्यायी मार्ग** :- त्रिवेणीनगर चौक- दुर्गानगर चौक मार्गे थरमॅक्स चौकमार्गे इच्छित स्थळी जातील.

## देहुरोड वाहतूक विभाग

१.मुंबई-पुणे जुना हायवे वरील सेंट्रल चौकातुन देहुकमान येथुन देहुकडे व भक्तीशक्ती चौकाकडे जाणाऱ्या जड/अजवड वाहनांना प्रवेश बंदी .

**पर्यायी मार्ग** - वरील मार्गावरील सर्व प्रकारची वाहने सेंट्रल चौक- मामुर्डी – किवळे - भुमकर चौक- डांगे चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

## तळवडे वाहतुक विभाग

१.खंडेलवाल चौक ते देहुकमान- परंडवाल चौक- साईराज हॉटेल चौक दरम्यान जड अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग:-कॅनबे चौक-तळवडे गावठाण-त्रिवेणीनगर-भक्ती शक्ती चौक मार्गे इच्छित स्थळी जातील

२.देहुगांव-रिंग रोड दरम्यान जड अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

तरी भोसरी, पिंपरी, चिंचवड, देहुरोड, तळवडे वाहतूक विभागांर्तगत वरील प्रमाणे वाहतुकीत बदल दि.१३/०७/२०२३ रोजी ०५.०० वा ते १३.०० वाजे पर्यत अथवा वाहतुक सुरळीत होई पर्यंत (अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन) जड/अवजड वाहनांसाठी लागु राहिल.

**टिप** - वरील प्रमाणे वाहतूक वळविण्यात आली आहे. परंतु आवश्यकतेनुसार टप्याटप्याने वाहतूक चालु/बंद करण्यात येईल.

(काकासाहेब डोळे)
पोलीस उप-आयुक्त, परि-२
अति कार्य वाहतूक पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

२/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी, भोसरी, पिंपरी, चिंचवड, निगडी, देहुरोड तळवडे वाहतुक विभाग

४) कार्यकारी अभियंता, सबंधीत प्रभाग, पिंपरी चिंचवड

२/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner